# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील गुप्तचर यंत्रणेस अपयश येत असल्याबाबत**

**(१) ४४६६७ (०६-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वरिष्ठ नेत्यांच्या निवासस्थानी एस.टी. कर्मचारी चालून जाणे, ऑनलाईन परिक्षा घेण्यासाठी हजारो विद्यार्थी रस्त्यावर येणे, अमरावती शहरामध्ये एका समाजाने मोर्चा काढून मोठ्या प्रमाणात तोडफोड करणे, कोरोना काळात परप्रांतीय मजुरांनी रेल्वेस्थानकावर प्रचंड गर्दी करणे जेजुरी येथील अहिल्यादेवीच्या पुतळ्याचे अनावरण यासारख्या प्रकरणांमध्ये राज्यातील गुप्तचर यंत्रणेला काहीच माहिती नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनांमधील गुप्तचार यंत्रणांच्या अपयशासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणातील घटनांमध्ये गुप्तचर यंत्रणेचे अपयश नसून विशेष शाखा-१, गु.अ.वि. , मुंबई शाखेस वर नमूद प्रकरणांबाबत आगाऊ माहिती होती. त्यानुसार कायदा व सुव्यवस्था दृष्टीकोनातून आवश्यक व योग्य ती कार्यवाही करण्यात आली होती.

राज्यातील गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

अ) राज्य गुप्तवार्ता विभागामध्ये पोलीस दलातून अनुभवी अधिकारी व कर्मचारी यांची प्रतिनियुक्तीने व सरळ सेवेने भरती केली जाते.

ब) राज्य गुप्तवार्ता विभागात भरती होणाऱ्या अधिकाऱ्यांकरिता मुलभूत प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे दिले जाते.

क) राज्य गुप्तवार्ता विभागामधील अधिकाऱ्यांना वेळोवेळी पदोन्नतीचे लाभ दिले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोजगारासाठी व अन्य कोणत्याही कारणासाठी इतर राज्यातून स्थलांतरीत झालेल्या नागरीकास जात प्रमाणपत्र त्यांच्या मूळ राज्यातूनच घेणे बंधनकारक असल्याबाबत**

**(२) ४६६३९ (०९-१०-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगारासाठी व अन्य कोणत्याही कारणासाठी इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या नागरीकास जाती प्रमाणपत्र त्यांच्या मूळ राज्यातुनच घेणे बंधनकारक असल्याची तरतूद दिनांक ४ जून, २००३ च्या महाराष्ट्र राज्याच्या राजपत्रात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामखुर्रा (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) या गावी छत्तीसगड राज्यातून स्थलांतरीत झालेल्या डोरीलाल तळीया यांचे कुटुंबातील सदस्यांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) होय, प्रस्तुत प्रकरणी श्री. डोरीलाल तळीया यांचे कुटुंबातील सदस्य त्यांची पत्नी नामे श्रीमती सकुबाई लल्लू शेंदरे यांना दि. १८.०७.२०१९ रोजी नमुना "क" मध्ये जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असल्याचे दिसून आले आहे. यासंदर्भात तत्कालीन उपविभागीय अधिकारी, अर्जुनी मोरगांव श्रीमती उषा चौधरी, सध्या कार्यरत तहसिलदार, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर यांना जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांनी दि.२६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये भविष्यात त्यांच्याकडून अशा प्रकारची कार्यवाही होणार नाही व स्वत: खात्री केल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे चुकीचे प्रमाणपत्र निर्गमित करणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सक्त ताकीद दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सदनिकाधारकांना क्षेत्रफळानुसार देखभाल शुल्क ( मेंटेनन्स ) अविभक्त टक्केवारीनुसार आकारण्याबाबत**

**(३) ४७९५६ (३१-१०-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपार्टमेंटमधील सदनिकाधारकांना क्षेत्रफळानुसार देखभाल शुल्क (मेंटेसन्स) अविभक्त टक्केवारीनुसार आकारण्यात यावा असा माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान सहकार न्यायालयाने निर्णय दिला असून त्या अनुषंगाने अपार्टमेंट कायद्यातील कलम १० प्रमाणे राज्यातील ५० हजारांपेक्षा अधिक अपार्टमेंटधारक व पुण्यातील १० हजारांपेक्षा अधिक अपार्टमेंटधारकांना सहकार न्यायालयाच्या निकालामुळे दिलासा मिळाला असल्याचे दिनांक २० मे, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, पुणे शहरात गत काही महिन्यांपासून अनेक अपार्टमेंटचे अध्यक्ष व सोसायटीचे सचिव नियम सर्वांना समान देखभाल शुल्क आकारला जात असल्याने नागरिकांच्या समस्या वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार चौकशीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :**(१), (२) व (३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अधिनस्त उपनिबंधक कार्यालयाकडे अपार्टमेंट असोसिएशन देखभाल शुल्काची आकारणी योग्य करत नसलेबाबत ०४ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे यांनी अर्जदार व अपार्टमेंट असोसिएशन यांची सुनावणी घेऊन वेश्म धारकांकडून क्षेत्रफळानुसार काढण्यात येणाऱ्या अविभक्त हिस्साच्या टक्केवारी नुसार देखभाल शुल्काची आकारणी करणेबाबत दि.०८.०७.२०२१ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरूध्द सहकार न्यायालय, पुणे येथे अपील क्र.०१/२०२१ दाखल करण्यात आले होते. सहकार न्यायालय, पुणे यांनी दि.१३.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दिलेला दि.०८.०७.२०२१ रोजीचा आदेश कायम केला आहे.

तसेच, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग यांचे अधिनस्त सहायक/उप निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे अशा प्रकरच्या तक्रारी दाखल झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवडी (मुंबई)येथील बीडीडी चाळीचा पुनर्विकास होण्याबाबत

**(४) ४९६१९ (२९-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील बीडीडी चाळींमध्ये राहणारी सुमारे ९६० कुटुंबे गेल्या २५ वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असून केंद्राकडून ही जागा राज्य सरकारला हस्तांतरीत होत नसल्याने बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बीडीडी इमारती या फार जुन्या असल्याने त्यांचा पुनर्विकास होणे आवश्यक आहे, केंद्र शासनाकडून जागा हस्तांतरित न होण्यामागणी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त इमारतींचा तातडीने पुनर्विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२३) :** (१) ते (४) मुंबईतील शिवडी येथे १२ बीडीडी चाळी असून, त्यामध्ये ९६० निवासी/अनिवासी सदनिका आहेत. तथापि, सदरहू चाळींची जमीन मुंबई पोर्ट ट्रस्ट/केंद्र शासनाच्या मालकीची असल्याने सदरहू जमीन म्हाडा/राज्य शासनास हस्तांतरीत करण्याची विनंती राज्य शासनाने तसेच म्हाडाने मुंबई पोर्ट ट्रस्ट/केंद्र यांना केलेली आहे. तथापि सदरची जमीन अद्याप म्हाडा/राज्य शासन यांच्या नावे हस्तांतरीत झालेली नाही. त्यामूळे शिवडी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या कामास सुरुवात करता आलेली नाही.

---

## राज्यातील विविध सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यान विरोधात दाखल खटले मागे घेण्याबाबत

**(५) ४९९६८ (०९-०३-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध सामाजिक व राजकीय आंदोलनातील कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याच्या संदर्भात शासनाने परिपत्रक काढले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सनदशीर मार्गाने बेमुदत आंदोलन, उपोषण करणा-या आंदोलनातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांवर पोलीसांनी मुंबई पोलीस अधिनियमाचे तरतुदीखाली गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आंदोलनात जिवीत हानी व मालमत्तेचे नुकसान झाले नसतानाही आंदोलनकाविरोध खटले प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यान विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले तातडीने मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**(१) होय,राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत शासनाने दि. २०/०९/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) हे खरे नाही. उपोषणकर्ते, आंदोलनकर्ते यांनी वेळोवेळी पोलीसांनी निर्गमित केलेल्या जमावबंदी आदेशाचे व त्यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४९ अन्वये देण्यात आलेल्या नोटीसीचा भंग केल्यामुळे त्यांचेवर भारतीय दंड विधान व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत
(३) राजकीय व सामाजिक आंदोलनातील प्रलंबित खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेताना शासन निर्णय दि. २०/०९/२०२२ मध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबतचे शासन निर्णय दि. २०/०९/२०२२ नुसार परिमंडळीय पोलीस उपायुक्त / उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचेस्तरावर समिती स्थापन केली असून सदर समितीमार्फत खटले मागे घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मराठवाड्यासाठी सिंचन योजनाच्या कालबध्द कार्यक्रमाची घोषणा केल्याबाबत

**(६) ५०१६५ (०९-०३-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मा.मुख्यमंत्री यांनी मराठवाड्यासाठी ३ हजार २३५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय विकासकामांसह सिंचन योजनांच्या कालबध्द कार्यक्रमाची घोषणा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घोषणेच्या अनुषंगाने माहे ऑक्टोबर, २०२२ अखेरी किती कोटी रुपयांचा निधी मराठवाड्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,
(३) असल्यास, अद्याप पर्यंत निधी उपलब्ध करुन देण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये ऑक्टोबर, २०२२अखेर मराठवाड्यासाठी विविध घटकामार्फत एकूण रु.७२४.९५५८ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### राज्यात मुले पळवणाऱ्या अपहरणकर्ते शहरात फिरत असल्याचे संदेश सोशल मिडीयावरून व्हायरल होत असल्याबाबत

**(७) ५१३७९ (१८-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुले पळवणाऱ्या अपहरणकर्ते शहरात फिरत असल्याचे संदेश सोशल मिडीयावरून व्हायरल होत असल्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणामुळे राज्यात अनेक ठिकाणी भीतीदायक वातावरण निर्माण होऊन अनेक संशयित समजुन संशयितावर हल्ले होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अफवा पसरवणाऱ्या टोळींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :**(१) नाही.
(२), (३) व (४)
नाशिक शहरात दि.२३.०९.२०२२ रोजी लहान मुले पळविण्यास आले असल्याच्या गैरसमजूतीतून संशयितास मारहाण झाल्याने इंदिरानगर पोलीस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं.१५४/२०२२ भा.दं.वि. कलम १४३, १४६, १४७, १४९, २३२, ५०४ अन्वये दि.२४.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ७ आरोपींना अटक करण्यात आले असून आरोपींविरुध्द दि.३१.०१.२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात १०० च्या क्षमतेचे वस्तीगृह सुरु करण्याबाबत**

**(८) ५१४१८ (२५-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजाच्या आरक्षण आणि सुविधा बाबत राज्य सरकारने नियुक्त केलेल्या उपसमितीच्या पहिल्या बैठकीदरम्यान मराठा आरक्षण व सुविधा याबाबत शासन सकारात्मक असून प्रत्येक जिल्हयात ५० मुले व ५० मुली असे १०० विद्यार्थांचे वस्तीगृह सुरु करण्याचा निर्णय मंत्री मंडळ उपसमितीच्या बैठकीत दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) उपरोक्त निर्णयानुसार किती जिल्ह्यात वस्तीगृह सुरू केले आहेत व विद्याथ्याची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाशिक येथे २०० विद्यार्थी क्षमतेचे मुलींचे वसतीगृह सुरु करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. जिल्हाधिकारी परभणी, जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडून वसतीगृहासाठी जागा प्राप्त झाल्या आहेत. जिल्हास्तरावर शासनाच्या विविध विभागाच्या मालकीच्या शासकीय/ निमशासकीय इमारती सुस्थितीत असून विनावापर आहेत अशा इमारतींची माहिती सर्व जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, नगरपालिका यांचेकडून सारथी कंपनी मार्फत प्राप्त करुन घेण्यात येत आहेत. तसेच उर्वरित ठिकाणी खाजगी इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित दरानुसार भाडे तत्वावर उपलब्ध करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र - मध्यप्रदेश सीमा भागातील पाल मार्गे अवैधरित्या गुरांची वाहतूक केल्याबाबत**

**(९) ५१४९८ (१७-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमा भागातील पाल मार्गे अवैधरित्या गुरांची वाहतूक करणाऱ्या काही तस्करांनी वाहनात कोंबलेल्या व गुदमरून दगावलेल्या २३ जनावरांना रावेर तालुक्यातील चिनावल उटखेडा दरम्यान पुलाखाली सुकी नदीच्या पात्रात फेकल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे , तसेच रावेर तालुक्यात अवैद्य मार्गे होणारी जनावरांची तस्करी रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) चौकशीच्या अनुषंगाने सावदा पो.स्टे. ला १६/०९/२०२२ रोजी CCTNS No. १८३/२०२२ प्रमाणे अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला असुन गुन्हयाचा तपास सुरु आहे.
जनावरांची तस्करी रोखण्यासाठी नाकाबंदी तसेच दिवसा व रात्री पेट्रोलिंग करिता पोलीस अधिकारी नेमण्यात आले असून सावदा पोलीस स्टेशनच्या हद्दीत जनावरांची अवैध तस्करी करणा-या वाहनांना पकडून सावदा व रावेर पोलीस स्टेशनला गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
जनावरांची अवैध तस्करी रोखण्यासाठी सावदा व रावेर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील पोलिसांची दिवस व रात्र पेट्रोलींग करण्यात येते. सदर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वेळोवेळी अचानक नाकाबंदी लावण्यात येऊन वाहनांची तपासणी करण्यात येत असते. अवैधरीत्या जनावरांची तस्करी करणारी वाहने पकडून त्यांच्यावर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे. यासह गुप्त बातमीदार यांच्यामार्फत माहिती काढून कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पॉप्युलर प्रट ऑफ इंडिया (पीएपआय) संघटनेच्या समर्थकांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर '' पाकिस्तान झिंदाबाद च्या दिलेल्या घोषणा**

**(१०) ५१६८२ (१८-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पॉप्युलर प्रट ऑफ इंडिया (पीएपआय) संघटनेच्या समर्थकांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोलिस परवानगी नसतांना आंदोलन करुन '' पाकिस्तान झिंदाबाद '' अशा घोषणा दिल्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संघटनेच्या राज्यात कोणकोणत्या ठिकाणी किती कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली आहे,
(३) असल्यास, सदर आंदोलकांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) संघटनेच्या एकूण २९ कार्यकर्त्यांना राज्यात विविध ठिकाणी अटक करण्यात आली आहे :-

| अ. क्र | ठिकाण | गुन्हा नोंद क्रमांक | अटक कार्यकर्ते |
|---|---|---|---|
| १ | दहशतवादी विरोधी पथक, काळा चौकी, मुंबई. | १९/२०२२ | ५ |
| २ | दहशतवादी विरोधी पथक, पुणे. | २०/२०२२ | ७ |
| ३ | दहशतवादी विरोधी पथक, औरंगाबाद. | २१/२०२२ | ६ |
| ४ | दहशतवादी विरोधी पथक, नागपूर. | २२/२०२२ | ६ |
| ५ | दहशतवादी विरोधी पथक, ठाणे. | २३/२०२२ | ५ |

(३) सदर आंदोलकांविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २५१/२०२२ भादंवि कलम ३४१, १४१, १४३, १४५, १४७, १४९, १८८, १०९, १५३(ए) १५३(बी), १२० (ब) सह महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम ३७(१)(३),

१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून उक्त प्रकरणी पोलीसांनी या संघटनेच्या ४१ लोकांना ताब्यात घेऊन त्यांना सी.आर.पी.सी कलम ४१(१) प्रमाणे नोटीसा दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्थेवर सन २०१४ पासून प्रशासक नियुक्त असल्याबाबत**

**(११) ५३३०७ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था, हिल रोड, सायन चुनाभट्टी, मुंबई ही म्हाडा नोंदणीकृत असून त्या संस्थेवर सन २०१४ पासून प्रशासक नियुक्त असून त्यास कार्यमुक्त करण्याबाबत म्हाडा प्राधिकरण तसेच गृहनिर्माण मंत्री आणि मा. मुख्य मंत्री याना दिनांक दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करूनही आवश्यक कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री. राजेंद्र गायकवाड, तत्कालीन उप निबंधक, म्हाडा यांच्या मौखिक आदेशानुसार हयात असलेल्या ५१% सदस्यांच्या स्वाक्षरीचे पत्र संस्था सदस्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी सादर करूनही त्यानूसार कार्यवाही झाली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (२) नुसार कार्यवाही न करता श्री.प्रशांत सोनवणे, उप निबंधक, म्हाडा यांनी श्री. आरिफ खान, तत्कालीन सह निबंधक, झो.पु.प्रा.यांच्या मौखिक आदेशावरून प्रथम वरील संस्थेची संपूर्ण कागदपत्रे झो.पु.प्रा.स हस्तांतरित केली व त्यानंतर दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रांवये त्यांनी म्हाडा प्राधिकारणास अवगत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषीवर आवश्यक ती कार्यवाही करुन संस्थेस न्याय मिळून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :**(१) चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था, हिल रोड, सायन व सायन चुनाभट्टी श्री.गुरूदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्था नियमानुसार कामकाज करीत नसल्याने, सदरहू संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) नुसार दि.२४.१२.२०१४ अन्वये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या निवडीसाठी दि.१२.०८.२०१८ रोजी निवडणूक प्रक्रीया सुरू करण्यात आली. तथापि, सदरहू निवडणूकीत संस्थेच्या कोणत्याही सभासदाने व्यवस्थापक समिती सदस्य या पदाकरीता अर्ज केला नसल्याने, व्यवस्थापक समिती अस्तित्वात येवू शकली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सहनिबंधक, सहकारी संस्था, झो.पु.प्रा. मुंबई यांनी त्यांच्या दि.१५.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये विषयाधिन दोन्ही संस्थेच्या भूखंडावर झो.पु.प्रा. ने पुनर्वसन योजना मंजूर केली असल्यामुळे, सदर संस्थेच्या धारीका पाठविणेबाबत कळविले होते. त्यानुसार, सदर संस्थांची पत्रव्यवहार धारिका म्हाडाच्या उप निबंधक कार्यालयाने त्यांच्या दि.२८.०९.२०२० च्या पत्रान्वये व नोंदणी धारिका दि.०२.११.२०२२ च्या पत्रान्वये झो.पु.प्रा. कडे पाठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगर कुर्ला-३ अंतर्गत न.भू. क्र.३७३ व २९५ वरील उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) यांच्या कार्यालयाने सन २०१६-१९ या कालावधीत केलेले सर्वेक्षण व त्यानुसार केलेली कार्यवाही चुकीची झाल्याने ती रद्द करण्याबाबत

**(१२) ५४७५९ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर कुर्ला-३ अंतर्गत न.भू. क्र.३७३ व २९५ वरील उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला-३,यांच्या कार्यालयाने सन २०१६ ते सन २०१९ या कालावधीत केलेले सर्वेक्षण व त्यानुसार केलेली अंतिम परिशिष्ट-२ बाबतची कार्यवाही चुकीची झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चूकीची झालेली कार्यवाही तातडीने रद्द करण्याबाबत त्या भूखंडावरील रहिवाश्यांनी उपजिल्हाधिकारी, मुंबई, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, वांद्रे, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग, तत्कालीन महसूल मंत्री व तत्कालीन मुख्य मंत्री, यांना दिनांक ३० जुलै, २०१९ ते दिनांक १४ जानेवारी, २०२० या कालावधीत वा त्यासुमारास आवश्यक कागदपत्रासह तक्रारी सादर केलेल्या आहेत, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कारवाई करून केलेली संपूर्ण सदोष प्रक्रिया रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही

(२) याबाबत तत्कालीन उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), कुर्ला, मुंबई, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, वांद्रे, अपर मुख्य सचिव (महसूल), तत्कालीन मंत्री (महसूल) तसेच तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(३) तत्कालिन उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), कुर्ला-२ यांचेकडून चौकशी करुन प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदारांना उत्तरे देण्यात आलेली आहेत. सदरहू प्रकरणाशी सबंधित जागा ही राज्य शासनाची असल्याने तेथे विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत एकूण २९२ झोपडीधारकांचे अंतिम परिशिष्ट-२ दि.२८.५.२०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामध्ये २२२ झोपडीधारक पात्र व ७० झोपडीधारक अनिर्णित होते. दि.२३.०७.२०२१ रोजी पुरवणी परिशिष्ट-२ निर्गमीत करण्यात आले आहे, त्यामध्ये अनिर्णित ७० झोपडीधारकांपैकी २० निवासी व १ अनिवासी असे एकूण २१ झोपडीधारक पात्र झाले. उर्वरित ४९ अनिर्णित झोपडीधारकांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे पात्रता निश्चित करण्याबाबतची कार्यवाही संबंधीत सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर सुरु आहे.

प्राप्त अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणात परिशिष्ट-२ तयार करण्याची कार्यवाही योग्य रितीने झाली असल्याचे आढळून येते. तसेच, झोपडीधारकांची पात्रता ठरविण्याच्या संदर्भात तक्रार असल्यास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ नुसार अपील दाखल करण्याची तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हॉकी महाराष्ट्र या संस्थेची निवडणूक संस्थेच्या नोंदणीकृत घटनेच्या व नियमांच्याविरुध्द पार पाडल्याबाबत

**(१३) ५४८७४ (२१-०१-२०२३). :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हॉकी महाराष्ट्र या संस्थेची निवडणूक संस्थेच्या नोंदणीकृत घटनेच्या व नियमांच्याविरुध्द जाऊन दिनांक १९ ऑगस्ट, २०२२ च्या परिपत्रकातील प्रति जिल्हा प्रत्येकी एक महिला एक पुरुष अशी नामांकने न घेता पार पाडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोंदणीकृत घटनेत नमूद प्रत्येकी एक अध्यक्ष, उपाध्यक्ष, सहसचिव अशी पदे न निवडता चार उपाध्यक्ष, एक वरिष्ठ उपाध्यक्ष, चार सहसचिव अशी पदे निवडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदणीकृत घटनेऐवजी बोगस बेकायदेशीर घटना परस्पर तयार करुन पाच ऐवजी चार वर्षात निवडणूका घेणे, पूर्ण पाच वर्ष झाल्यानंतर सदस्यत्व बहाल करण्याऐवजी लगेच संस्थेला सदस्यत्व देणे, मुंबई जिल्हा संस्था ही मुंबई शहर व उपनगर अशी बेकायदेशीरपणे विभागणी करणे, निवडणूक प्रक्रियेवर आलेले दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास आलेले आक्षेप, हरकती व सूचना इत्यादींवर कोणताही निर्णय न घेता निवडणुकीचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणातील संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(१३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही आहे. "द हॉकी महाराष्ट्र" हा एफ-४५५८८ (पुणे) या नोंदणी क्रमांकाने सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे येथे नोंदणीकृत आहे. सदर न्यासाचा कोणताही उल्लेखीत बदल अर्ज पुणे कार्यालयात प्रलंबीत नाही. त्याच प्रमाणे

उल्लेखीत निवडणूकी बाबत कोणतीही तक्रार पुणे कार्यालयात अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच "हॉकी महाराष्ट्र या नावाने सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड येथे नोंदणी क्र.महा/२८३/२०१५ या क्रमांकाने संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेली आहे. परंतु महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०

मधील कलम १९ नुसार न्यास नोंदणी चौकशी अर्ज क्र. ४५६/२०१५ मध्ये कमांडो कहेर सिंग यांची हरकत आलेली असून सदर हरकतीत त्यांनी सदर न्यास सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे कार्यालयात नोंदणीकृत असल्याचे हरकतीत नमुद आहे. त्यामुळे सदर प्रकरण वादग्रस्त आहे. सदर प्रकरणात चौकशी सुरू असल्याने

प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी प्रलंबीत आहे. त्यामुळे रायगड कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम १९ नुसार न्यास नोंदणी झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

सदर निवडणूकीबाबत कोणताही बदल अर्ज संबंधीत अधिकारीणी समोर अद्याप पर्यंत दाखल झालेला नाही. तसेच उल्लेखीत निवडणूकीबाबत कोणतीही तक्रार अद्याप प्राप्त नाही.

(४), (५) प्रश्न उद्भवत नाही

---

### ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पोलीस ठाण्यातील हद्दीत अवैध काम सुरु असल्याबाबत

**(१४) ५६६७२ (३०-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत व ओझर मिग शहरात मोठ्या प्रमाणावर अवैध कामे सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ व जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या भागात सुरु असलेल्या अवैद्य धंद्यांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच दुर्लक्ष करणाऱ्या सबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) व (२) होय, अवैध धद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती नुसार चोरुन लपून चालणारे अवैध धंद्यावर छापे टाकून कारवाई करण्यात आलेली आहे.

ओझर मिग, पोलीस ठाणे हद्दीत डिसेंबर, २०२२ ते जानेवारी २०२३ मध्ये दारुबंदीची ५ गुन्हे उघडकीस आणली असून त्यामध्ये रुपये ४२,२९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच जुगाराबाबत ५ गुन्हे दाखल करण्यात आली असून ११ आरोपींवर कारवाई करुन रुपये १,५९,४००/- किंमतीचे जुगाराचे साहित्य व साधने जप्त करण्यात आली आहे.

(३) अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाय योजना करण्यात आल्या आहेत:-

१) अवैध धंदे नष्ट करण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आलेले असून रेड करुन गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येते.

२) प्रभारी पोलीस अधिकारी यांचे मोबाईल क्रमांक जनतेला उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, व तक्रार करणेबाबत जनतेला आव्हान करण्यात आले आहे.

३) अवैध धंदे करणाऱ्या आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

४) ग्रामीण भागातील पोलीस पाटील यांना देखील असे अवैध धंदे सुरु होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी सूचना करण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## धुळे जिल्ह्यात चोरी व लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१५) ५६६८६ (०३-०५-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामोडे (जि.धुळे, ता.साक्री) येथील जुनागाव परिसरात चोरट्यांनी तब्बल ६ घरे फोडून चोरी केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर चोरीच्या घटनांना आळा घालण्याबरोबरच दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :**

(१) जुनागाव परिसर, सामोडे, ता.साक्री, जि. धुळे येथे दिनांक ०९.०१.२०२३ च्या सुमारास एकुण पाच घरफोडीच्या घटना घडल्या आहेत.

(२) या प्रकरणी पिंपळनेर पोलीस स्टेशन, येथे गु.र.नं.०८/२०२३ भा.दं.वि. कलम ३८०, ४५७ प्रमाणे दिनांक १३.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एक आरोपीस अटक करण्यात आले असून तीन विधी संघर्षग्रस्त बालकांना मा.बाल न्यायालया समोर हजर करण्यात आले. तसेच सर्वांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी दिवसा व रात्रीच्या पेट्रोलींगमध्ये वाढ करण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## सटाणा -मालेगांव (जि.नाशिक ) शहरात मोठया प्रमाणात घरफोडयां होत असल्याबाबत

**(१६) ५७१८७ (३०-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा -मालेगांव (जि.नाशिक ) शहरात मोठया प्रमाणात घरफोडयांचे सत्र सुरु असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सटाणा शहरातील मालेगाव रस्त्यावरील मंगेश सोनवणे यांच्या घरात केलेल्या घरफोडीत लाखाचा ऐवज लंपास केल्याचे समोर आले आहे हे , ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सलग दोन दिवस भरदिवसा घराचे कुलुप तोडून १८ लाख ७९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरटयांनी लुटून नेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक पोलिसानी तपास केला आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) सटाणा-मालेगांव जि. नाशिक येथे माहे डिसेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ मध्ये घरफोडीच्या घटनांच्या अनुषंगाने सटाणा, मालेगाव व आझादनगर पोलीस स्टेशन येथे एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) (३) व (४) होय.
(अ) श्री.मंगेश सोनवणे यांच्या घरात झालेल्या चोरीत रुपये २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याबाबत फिर्याद प्राप्त झाली असून त्यानुसार सटाणा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गन्ह्याचा तपास सुरु आहे.
(ब) मालेगाव शहरातून दिनांक १४ व १६ जानेवारी, २०२३ रोजी दोन घरफोडीच्या घटना झाल्या असून त्यात अनुक्रमे रुपये १८,७९,७००/- व रुपये १७,५९,०००/- चा मुद्देमाल चोरीला गेल्याची फिर्याद प्राप्त झाली असून यामध्ये मालेगाव शहर पोलीस स्टेशन येथे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर दोन्ही गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली असून अनुक्रमे रुपये ८,८७,८८० व रुपये ९,१६,३०० चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
याप्रमाणे घरफोडीच्या घटनेत तात्काळ गुन्हा दाखल करुन गुन्हा तपासाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

## नाशिक येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील स्टेज-१ च्या बदल्यात मंजूर असलेला ६६० मेगावॅट प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(१७) ५७४१८ (३०-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील स्टेज-१ च्या बदल्यात मंजूर असलेला ६६० मेगावॅट प्रकल्प गेल्या कित्येक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच नाशिकजवळ असलेल्या व सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या एकलहरे प्रकल्पाचा विकास करण्याबाबत प्रकल्प बचाव संघर्ष समितीने शासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने अपूर्ण अवस्थेत असलेला ६६० मेगावॅट प्रकल्प पूर्ण करण्याबाबत तसेच एकलहरे प्रकल्पाचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
नाशिक येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पास दिनांक २९.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी मिळाली होती. तथापि, सदर संच कोळसा स्त्रोतापासून दूर अंतरावर असल्याने कोळश्याची पुरवठा किंमत, परिणामी संचातून तयार होणाऱ्या विजेचा जास्तीचा अस्थिर आकार इ. कारणामुळे मेरीट ऑर्डर डिसपॅच (MOD) प्रणालीनुसार वीज निर्गमित होण्याबद्दल असलेली साशंकता, तसेच भारत सरकारचे खाणीजवळ असलेल्या परंतु रखडलेल्या प्रकल्पांना कोळसा पुरवठा संबंधित धोरण इ. बाबींमुळे सदर प्रकल्प स्थगित ठेवण्यात आला होता.

तद्नंतर तत्कालिन मा.मंत्री (ऊर्जा) यांनी दिनांक २७.८.२०२० रोजीच्या बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाऐवजी सदर जागेवर सौर प्रकल्प अथवा औद्योगिक वसाहत व इतर पर्यायासंदर्भात विचार करावा असे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाच्या अनुषंगाने पडताळणी सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) होय हे खरे आहे.

(४) तत्कालिन मा.मंत्री (ऊर्जा) यांनी दिनांक २७.८.२०२० रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रस्तावित प्रकल्पाऐवजी सदर जागेवर सौर प्रकल्प अथवा औद्योगिक वसाहत व इतर पर्यायासंदर्भात पडताळणी सुरु आहे.

नाशिक येथील एकलहरे प्रकल्पाचा विकास करण्याच्या दृष्टीने जुन्या संचांचे आयुर्मान ४० वर्षापेक्षा जास्त झालेले असल्यने सदर संच पूर्ण कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी संचांची नियमित आणि वार्षिक देखभाल व इतर आवश्यक कामे करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## कनाशी (ता. कळवण जि. नाशिक) येथे १३२/३३ के.व्ही. वीज उपकेंद्रास मंजुरीसह निधीची तरतुद करण्याबाबत

**(१८) ५७५२९ (३०-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण व सुरगाणा तालुक्यातील (जि. नाशिक) येथे वीज पुरवठा सुरळीत होत नसल्याने कनाशी (ता. कळवण, जि. नाशिक) येथे १३२/३३ के.व्ही.ए. उपकेंद्रास मंजुरी मिळणे कामी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा.उप मुख्यमंत्री यांना दिनांक २७ जानेवारी, २०२२ मा. ऊर्जा मंत्री यांना दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२२ दिनांक ०५ मार्च, २०२२ ऊर्जा यांना दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२२ वा त्या सुमारास निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिउच्चदाब कनाशी (ता.कळवण) १३२/३३ के.व्ही. नवीन उपकेंद्राचा तांत्रिक प्रस्ताव महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी सांघिक कार्यालय स्तरावर प्रक्रियाधीन असून याची पडताळणी पुर्ण झाल्यावर आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील मंजुरीसाठी महापारेषण कंपनीस महावितरणकडून पाठविणेचे नियोजित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन १३२/३३ के.व्ही.ए. उपकेंद्रासाठी निधीसह मंजुरी कामी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

महावितरण कंपनीकडून महापारेषण कंपनीस कनाशी, ता. कळवण येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव दिनांक ०५.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

(३) राज्य पारेषण उपक्रमातर्फे १३२ के.व्ही. कनाशी उपकेंद्राच्या प्रस्तावाबाबत प्रणाली अभ्यास पूर्ण झाला असून नियमानुसार उपकेंद्र मंजूरीसंबंधीची पूढील कार्यवाही सूरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**अकोला जिल्ह्यातील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचा केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समावेश करण्याबाबत**

**(१९) ५७९०३ (३०-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचा शासनाने राज्यपालांच्या सिंचन अनुशेष निमुर्लन कार्यक्रम व केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काटीपाटी बॅरेज प्रकल्पास केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ३३० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय प्रस्ताव उच्चाधिकार समिती कडून मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सुधारीत प्रशासकीय प्रकल्पाच्या मान्यतेस मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प हा मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या सिंचन अनुशेष निमुर्लन कार्यक्रमामध्ये समाविष्ट नाही, तथापि केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समाविष्ट आहे.

(२) केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत सदर प्रकल्पावर दि. ०१/०४/२०१८ च्या उर्वरीत निधी रु.३२३.७५ कोटी करीता अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा २५% व राज्य हिस्सा ७५% ) मंजूर आहे. काटीपाटी प्रकल्पासाठी बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत दि.३१/१०/२०२१ पर्यंत रु.२.५६ कोटी निधी खर्च करण्यात आला असून रु.०.०११५ कोटी इतके केद्रिय अर्थसहाय्य प्राप्त झालेले आहे.

(३) होय.

(४) याबाबत सद्यस्थितीस सन २०२२-२३ चे दरसूची नुसार अद्यावत सुधारीत प्रस्तावाबाबत रा.तां.स.स., नाशिक यांचे दि. ०१/०२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील उपस्थित मुद्द्यांबाबतची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे तारा ( ता. पनवेल, जि.रायगड) येथे एका व्यक्तीची झालेली हत्या**

**(२०) ५७९८३ (२६-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तारा, (ता. पनवेल, जि.रायगड) येथे श्री. संजय कार्ले यांची दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास हत्या झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का ,

(२) असल्यास, शासनाने हत्येची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) होय.

(२) सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करून पोलीस ठाणे, पनवेल (जि. रायगड) येथे गु. र. क्र. २५९/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२, ४०४, २१२, ३४ सह भा. ह. का. कलम ३, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) वरील गुन्ह्याच्या अनुषंगाने चार आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्या मुंबई-पुणे या राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात शिंग्रोबा मंदिराजवळ टेम्पो उलटून अपघात झाल्याबाबत**

**(२१) ५७९८६ (३०-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मुंबई-पुणे या राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात शिंग्रोबा मंदिराजवळ टेम्पो उलटून दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपघाताची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, वारंवार येणारे अपघात कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) दि.३१ डिसेंबर, २०२२ रोजी खोपोली पोलीस ठाणे हद्दीत शिंग्रोबा मंदिराजवळ एका ट्रकचालकाने अतिवेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोठ्या दगडास ठोकर मारून अपघात करून एका व्यक्तीच्या मृत्यूस व स्वत:च्या दुखापतीस कारणीभूत झाला.
ट्रक चालक याचेवर खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.४१७/२०२२ भा.द.वि. क.३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दि.३१.१२.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) या महामार्गावर होणारे अपघात कमी करण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.
- उपरोक्त महामार्गावर मेटल व कॉन्क्रीट क्रॅश बॅरीअर बसविले आहेत.
- वाहन चालकांना सूचना देणारे फलक लावण्यात आलेले आहेत.
- सदर महामार्गावर रिफ्लेक्टर स्ट्रीप्स लावण्यात आलेल्या असून पी.ए. सिस्टीममार्फत वाहन चालकांना सूचना देण्यात येत आहेत.
- अपघातप्रवण ठिकाणी वाहन चालकांना सूचना देण्यासाठी एलईडी लाईटचे बोर्ड लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महारेराने रायगड जिल्हयात जारी केलेल्या पुर्नप्राप्ती वॉरंट बाबत**

**(२२) ५८४८६ (२६-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महारेराने जारी केलेल्या पुर्नप्राप्ती वॉरंटच्या आधारे पनवेल तहसीलदार कार्यालय सुमारे ६.८ कोटी वसूल करण्यासाठी नवी मुंबईतील एका बिल्डरच्या मालमत्तेचा लिलाव करणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महारेराने रायगड जिल्ह्यात एकूण १५ कोटींहून अधिक रकमेचे पुनर्प्राप्ती वॉरंट जारी केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील १३ जिल्हाधिकारी कार्यालयांना महारेराने पुर्नप्राप्तीमध्ये सहकार्य करण्याबाबत स्मरणपत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी किती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कारवाई सुरु करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे,

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाकडे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचे कार्यालयाकडून माहे जानेवारी, २०२३ अखेर ९९ महसूल वसूली प्रमाणपत्रे प्राप्त झाली त्यापोटी रु. १९.९८ कोटी वसूल करावयाची असून, त्यापैकी ४६ प्रकरणांमध्ये अंशत: रु. ५.५७ कोटी व एका प्रकरणामध्ये पुर्णत: रु. ०.२१ कोटी अशी एकूण ४७ प्रकरणांमध्ये रु. ५.७८ कोटी एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच, १४ प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत.

तसेच राज्यातील १३ जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथे महावितरण मध्ये काम करणाऱ्या २५० कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केल्याबाबत**

**(२३) ५८५६८ (२६-०४-२०२३).** **:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथे महावितरण मध्ये काम करणाऱ्या २५० कंत्राटी कामगारांना तांत्रिक कर्मचारी पदासाठी शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अचानक कमी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कर्मचाऱ्यांनी ३० दिवसांपर्यंत जिल्हाधिकारी जळगाव कार्यालयासमोर उपोषण करूनही त्यांच्या मागण्यांबाबत कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, महावितरण ने संबंधित ठेकेदारांमार्फत कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करताना शैक्षणिक अर्हता तपासणी केली नव्हती , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कर्मचारी अचानक बेरोजगार झाल्यामुळे सदरील भरती प्रक्रियेची संपूर्ण चौकशी करण्याच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या बाहयस्त्रोत कुशल तांत्रिक कामगार (इलेक्ट्रिकल असिस्टंट) करीता विहीत नमुद केलेली शैक्षणिक पात्रता ITI (Electrical / Wireman) अशी निश्चित करण्यात आलेली आहे. सदर बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांकडे विहीत नमुद केलेली शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्यांना कंत्राटदार संस्थेने कामावर घेतलेले नाही.

(२) सदरील बाहयस्त्रोत तांत्रिक कंत्राटी कामगार हे जिल्हाधिकारी जळगांव कार्यालयासमोर उपोषणास बसले नव्हते मात्र महावितरण कंपनीच्या कार्यालया समोर उपोषणास बसले होते. सदर बाहयस्त्रोत कंत्राटी तांत्रिक कामगारांकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता नसल्याने ठेकेदार संस्थेने त्यांना कामावर घेण्यासाठी असमर्थता दर्शविली आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

महावितरण कंपनीकडून ठेकेदार संस्थेस फक्त बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार पुरविण्यासंबंधी कार्यादेश संख्येच्या रुपात देण्यात येतो. त्यामुळे सदर संख्येनुरुप बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार ठेकेदार संस्थेमार्फत पुरविण्यात येतात. सन २०२० पासून संपर्क पोर्टलमध्ये बाहयस्त्रोत तांत्रिक कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे अद्यावत करणे अनिवार्य असल्यामुळे व सदर कर्मचाऱ्यांकडे सदर प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना कामावर घेण्यासाठी कंत्राटदार संस्थेने असमर्थता दर्शविली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घर खरेदी विक्री पोटी विकासकांकडून जीएसटी परतावा रक्कम पुनश्च ग्राहकास अदा करण्याबाबत

**(२४) ५८९९७ (०८-०५-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील क्रिसेंट बे या गृहप्रकल्पात विकासकाने घर विक्रीपोटी जीएसटी ची वसुली करुन त्याचा प्रशासनाकडे भरणा न करणाऱ्या दोन विकासकांना राष्ट्रीय नफेखोरी प्रतिबंधक प्राधिकरणाने सुमारे ८५० ग्राहकांना ३०.७६ कोटी रुपेय वार्षिक १८ टक्के व्याजाने परत करण्याचे निर्देश दिल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबई ग्राहक पंचायतीनी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पातील ८५० ग्राहकांना तात्काळ जीएसटी परतावा रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अद्याप विकासकाने घर खरेदी केलेल्या ८५० ग्राहकांना जीएसटी परतावा रक्कम दिली नसल्यास, याकडे करण्यात आलेल्या दुर्लाक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच, मुंबईत गेली ५ वर्षात घर खरेदी विक्री प्रकरणात शासनास जीएसटी रक्कम भरलेल्या किती ग्राहकांना अद्याप पर्यंत किती परतावा रक्कम देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

सदर विकासकाने सर्व विवरणपत्र दाखल केलेली आहेत, त्यानुसार शासनास जीएसटी कराचा भरणा केलेला आहे.

दोन विकासकांना राष्ट्रीय नफाखोरीविरोधी प्राधिकरणाने केस क्र.५१/२०२२ मध्ये दिनांक २९.०७.२०२२ रोजी आदेश पारित करून, ३०.७६ कोटी एवढी रक्कम संबंधित प्रकल्पातील फ्लॅट धारकांस परत देण्यास सांगितले आहे, हे खरे आहे.

(२) विकासकाने संबंधित राष्ट्रीय नफाखोरीविरोधी प्राधिकरणाच्या आदेशाविरूद्ध मा.उच्च न्यायालयाकडे रीट याचिका (Writ Petition No.३३८८७/२०२२ व ३३९२५/२०२२) दाखल केलेला असून, सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(३) लागू नाही.

(४) घर खरेदी विक्री प्रकरणात राष्ट्रीय नफाखोरीविरोधी प्राधिकरणाने आदेश पारित करून ग्राहकांना जीएसटीची रक्कम परत द्यावयाची सांगितली असल्यास अशा प्रकरणात संबंधित विकासकाने फ्लॅट धारकास ती रक्कम परत करावयाची आहे. फ्लॅटधारकांनी जीएसटी विभागास याबाबतीत अर्ज करण्याची कुठलीही तरतूद कायद्यात नाही, त्यामुळे विभागाकडे याबाबतची माहिती उपलब्ध नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीबाबत

**(२५) ५९२९३ (०३-०५-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी शासनाने ४२ कोटी ५९ लाख रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकाला दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मागील अनेक वर्षापासून सदर प्रकल्पाची दुरुस्ती प्रलंबित असल्याने मोठया प्रमाणात पाणीगळती होऊन परिसारातील ग्रामस्थ,शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने प्रकल्पाची पाहणी करुन दुरुस्तीची कामे तातडीने करण्याबाबत स्थानीक लोकप्रतिनिधी यांनी मां.जलसंपदा मंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या दुरुस्ती खर्चाच्या अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळून एक वर्ष झाले तरी अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने प्रकल्प दुरुस्तीचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प दुरुस्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
तावरजा मध्यम प्रकल्पाच्या सांडव्यावरील अस्तित्वातील स्वंयचलित द्वारे पूर्णपणे काढून त्याऐवजी उभी उचलद्वारे बसविणे व माती धरण दुरुस्ती करणेच्या कामास शासनाने दि.०६.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष दुरुस्तीअंतर्गत रु.४१.५९ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) होय,हे खरे आहे.
(४) सदर कामाच्या निविदेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव दाभाडे (जि. पुणे )येथील डी.एस.के.सदाफुले गृहनिर्माण प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) ५९३६३ (२६-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथील डी.एस.के.सदाफुले गृहनिर्माण प्रकल्प माहे जानेवारी, २०१३ पासून प्रलंबित असल्याने १६१ घर खरेदीदारांना आपल्या हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गृहनिर्माण प्रकल्प अपूर्ण अवस्थेत राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील प्रकल्प पूर्ण करुन १६१ घरे खरेदीरांना घरे देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) डिएसके वर्ल्डमॅन प्रोजेक्ट लि. व डि.एस.कुलकर्णी कंपनी असे मूळ विकासकांच्या प्रकल्पाचे नाव होते. सदर प्रकल्प सन २०१९ मध्ये ७० ते ८० टक्के पुर्ण झाले होते. परंतु, मुळ विकासक DSK हे फेब्रुवारी, २०१८ मध्ये विविध कलमातंर्गत तुरुंगात गेल्यामुळे प्रकल्प अपुर्ण राहिला आहे.
(३) सदाफुली प्रकल्पाच्या घर खरेदीदारांनी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे जुलै, २०१९ मध्ये तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण येथे सुनावणी झाली. तद्नंतर घर खरेदीदारांची असोसिएशनने, प्रकल्प वित्त पुरवठादार आणि घर खरेदीदारांच्या असोसिएशने नियुक्त केलेले विकासक यांच्यातील सामंज्यस करार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण समोर दाखल करण्यात आला. त्यानुषंगाने महारेराने दि.१५.०७.२०२२ रोजी आदेश पारित केला आहे. सध्या महारेराच्या संकेतस्थळावर नवीन विकासकाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेले दि.२४.०४.२०२३ रोजीचे अंशत: भोगवटा प्रमाणपत्र अपलोड केलेले आहे. आजमितीला नवीन विकासकातर्फे १६१ पैकी ५५ घर खरेदीदारांना देण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी सुधारित धोरण ठरविण्याबाबत**

**(२७) ६०२५९ (०८-०५-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सततच्या जलसिंचनामुळे राज्यात चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढले असून, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय (IRD) च्या माध्यमातून यापूर्वी चिबड, खारवट व पाणथळ जमिनी निर्मुलन कार्यक्रम आखण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जलसंपदा विभागाच्या दिनांक २१ जुलै, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार ८० टक्के शासन निधी, १० टक्के संबधित जमीन मालक व १० टक्के CSR असे धोरण ठरविण्यात आले व तदनंतर ९० टक्के शासन निधी, १० टक्के संबधित जमीन मालक असे धोरण ठरविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. हेही खरे आहे काय

(३) असल्यास,उक्त या धोरणामुळे कालवा लाभक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून कालवा लाभक्षेत्रातील पाझरचर योजनांचे धोरण कालवा लाभक्षेत्राबाहेरील शेतकरी यांच्यासाठी निश्चित करावे व १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करावी अशी मागणी दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करून, सुधारित धोरण तयार करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) दि.२१/०७/२०२० रोजीच्या जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयानुसार ८० टक्के शासन निधी, १० टक्के संबंधित जमीन मालक व १० टक्के CSR असे धोरण ठरविण्यात आले आहे. तदनंतर कोणतेही धोरण ठरविण्यात आले नाही.

(३) हे खरे नाही तथापी मा.विधानसभा सदस्य श्री. राहूल कुल यांचे पत्र क्र. दौंडविसस /मुंबई ०९४/२०२२ दिनांक १३/०९/२०२२ अन्वये संबधित शासन निर्णयातील शेतकऱ्यांची १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करण्याची विनंती शासनास केली आहे.

(४) मा.विधानसभा सदस्य श्री. राहूल कुल यांचे पत्र क्र.दौंडविसस / मुंबई ०९४/२०२२ दि. १३/०९/२०२२ च्या अनुषंगाने १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करणेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उचीत निर्णय घेण्याबाबत पूढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई म्हाडाच्या मालकीच्या जागेवरील अनधिकृत अतिक्रमावर कारवाई करण्याबाबत**

**(२८) ६०२८३ (०३-०५-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई म्हाडाच्या मालकीच्या जागेवरील अनधिकृत अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाचे सुरक्षा कर्मचारी उपलब्ध असून अतिक्रमणावरील कारवाईच्या वेळी स्थानिक पोलीसांचे पुरेशे बळ नसल्याने अतिक्रमण विरोधी कारवाईत अडचणी येत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे भूभागाची कमतरता असल्याने घरांच्या सोडतीवरही परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक पोलीसांच्या बळाअभावी अतिक्रमण विरोधी कारवाई करणे शक्य होत नसल्याचे म्हाडा अधिकाऱ्यांचे म्हणणे असून अतिक्रमण विरोधी प्रत्यक्ष कारवाई वेळी कायदा, सुव्यवस्था वा अन्य कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस संरक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) होय.
(२) (३) व (४) मुंबई मधील म्हाडा इमारतींबाबत विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार म्हाडाला मे, २०१८ मध्ये प्राप्त झाले आहेत. त्यानुसार, बेकायदेशीर बांधकामांचे निष्कासन करतेवेळी स्थानिक पोलीस ठाण्यामार्फत नियुक्त तारखेस निश्चितपणे किमान पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याकरीता मंडळामार्फत जुलै, २०२२ पासून रितसर पत्रव्यवहार पोलीस आयुक्त कार्यालयास करण्यात आला होता. त्याअनुषंगाने, जानेवारी २०२३ मध्ये पोलीस उपायुक्त (अभियान) यांचेसह झालेल्या बैठकीत सुरळीत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. मुंबई मंडळ म्हाडामार्फत अतिक्रमण निष्कासनाच्या कामकाजासाठी स्थानिक पोलीस ठाण्यामार्फत किमान पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुपारीबाग (ता.जामनेर,जि.जळगाव) महावीर ॲग्रो खाजगी मार्केटमधील गोडावूनमध्ये ठेवलेला सोयाबीन व मका परस्पर विक्री केल्याबाबत

**(२९) ६०२८९ (२६-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील जामनेर येथील पिडीत व्यापाऱ्यांनी त्यांचेकडे धान्य पीकमाल ठेवण्याची व्यवस्था नसल्यामुळे पिडीत श्री.सुनिल दामू गुजर व्यापाऱ्यांसह तेथील महावीर अँग्रो खाजगी मार्केट कमेटीमधील कोठारी बंधूच्या गोडावूनमध्ये माल सुरक्षित राहण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान भाडेतत्वावर ठेवण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोठारी बंधू गोदाम मालकांनी कोणतीही परवानगी न घेता अन्य व्यापाऱ्यांच्या मालाची परस्पर विक्री करुन श्री.सुनिल गुजर या पिडीत व्यापाऱ्यासह अन्य व्यापाऱ्याची देखील आर्थिक फसवणूक करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिडीत व्यापारी (श्री.गुजर) यांनी, काटा, पावत्या, हिशोबाचे पेपर, गाडी क्रमांक तेथील फोन रेकॉडिंगसह सर्व पुराव्यासह पोलिस अधिक्षक, जळगांव यांचेसह सर्व पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करुनही कोठारी बंधू यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला नाहीच परंतु जामनेर, पोलिस निरीक्षक यांनी तक्रारदारास दमबाजी करुन गोदाममालक कोठारी बंधू यांचे नादी लागू नकोस अन्यथा परिणाम वाईट होतील अशाप्रकारचा दम भरुन तक्रारदारास धमकी दिली असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी तक्रारदाराने मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, पोलीस अधिक्षक,जळगावं, सहकार मंत्री, पोलिस महानिरीक्षक, मुंबई यांचेकडे त्याचदिवशी तक्रार निवेदने सादर करुन गोदाम मालकाविरुध्द तसेच जामनेर स्थानिक पोलिस अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) होय,
(२) व (३) नाही,
पिडीत व्यापारी श्री.सुनिल गुजर यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीनुसार नमूद गोडावूनमध्ये माल ठेवलेला होता, तथापि, अर्जदार यांना मालाचे पैसे आर.टी.जी.एस व्दारे दिलेले असल्याने फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले नाही.

तसेच श्री. साई टोल काटा, नेरी ता. जामनेर यांचेकडील पावत्या ह्या बनावट असल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले आहे. तसेच दिनांक २३.०१.२०२३ वा त्यासुमारास तक्रादार यांना धमकी दिल्याचे आढळून आलेले नाही.

(४) व (५) होय

सदर तक्रारी मधील बाबी दखलपात्र स्वरुपाच्या नसून दिवाणी स्वरुपाच्या असल्याने अर्जदार यांना मा.दिवाणी न्यायालयात दाद मागण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचे विरुध्द सीआरपीसी १५६(३) नुसार चौकशी होण्याबाबत मा. जामनेर न्यायालय येथे दाखल अर्ज मा. न्यायालयाने फेटाळला, तदनंतर अर्जदार यांनी मा.जळगाव जिल्हा न्यायालय येथे रिव्हयु पिटीशन दाखल केले असता रिव्हयु पिटीशन देखील फेटाळले आहे.

सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

## परभणी शहरातील कायदा आणि सुव्यवस्था यांची अमंलबजावणी योग्य रित्या होत नसल्याबाबत

**(३०) ६०४४२ (०३-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील कायदा आणि सुव्यवस्था यांची अमंलबजावणी योग्यरित्या होत नसल्याने खंडोबा बाजार परिसरात घर फोडी करीत अज्ञात चोरटयांनी रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने मिळून ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरले असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अनोळखी चोरटयांवर नानलपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर गुन्हयाचा तातडीने तपास लावून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१), (२) व (३)

परभणी शहरात पोलीस घटकाकडून नियमित सतर्क रात्रगस्त, मोबाईल पेट्रोलींग, बिट मार्शल, प्रभाग पेट्रोलींग यान्वये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात येते तथापि, दिनांक २३.०१.२०२३ रोजी खंडोबा परिसरात घराचा दरवाजा काळजीपूर्वक बंद न केल्यामुळे अज्ञात चोरट्याने घरात सहज प्रवेश करुन रुपये ५१,०००/- चा मुद्देमाल चोरी केल्याची घटना घडली आहे.

सदर प्रकरणी तक्रारदार यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द नानलपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२८/२०२३ भा.दं.वि कलम ४५४, ३८० प्रमाणे दिनांक २३.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथे महिलेस पेटवून दिल्याबाबत

**(३१) ६०६७३ (३०-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथे शारीरिक संबंधास विरोध करणाऱ्या महिलेस पेटवून दिल्याची घटना दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०२३) :** (१) व (२) सदर प्रकरणी पिडीत महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन भडगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ३३०/२०२२ भादंवि क. ३०७, ३५४, ३५४ अ, ३२३, ५१० अन्वये गुन्हा दाखल केला असून उपचारादरम्यान पिडिता मयत पावल्याने सदर गुन्ह्यात भादवि क.३०२ समाविष्ट करण्यात आले आहे. तपासामध्ये, पिडित महिला हिस दुर्धर आजार असून ती आजाराला कंटाळली होती, या आजारामुळे आपले पती व मुलांना त्रास होवू नये तसेच मुलांच्या स्पर्धा परिक्षा अभ्यासात व्यत्यय येवू नये म्हणून तीने आजाराला वैतागून स्वतःच जाळून घेतले असे तपासात निष्पन्न झाले. करिता सदर गुन्ह्यात ब फायनल समरी कारवाई सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरात गुन्हेगारीत होत असलेली वाढ

**(३२) ६०७१७ (०३-०५-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरात मागील काही दिवसांपासून चोऱ्यांचे वाढते प्रमाण, मटक्याचे धंदे, तीन पत्ती जुगार , जन्ना मन्ना सट्टा पिढ्या, अवैध दारू गांजा विक्री यासारखे अवैद्य धंदे सर्रासपणे सुरू असल्याच्या तक्रारी बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधिक्षक, धुळे यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे शहर विशेषत: गजानन कॉलनी, आजाद नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत व वडजाई रोड भागात चोरीच्या गुन्ह्यांमध्ये तसेच महिलांच्या गळयातील मंगळसूत्र, चैन हिसकावणे, मोटारसायकल चोरी, घरफोड्या आदि घटनांमध्ये वाढ होवून स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे त्यास अभय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धुळे शहर व आजाद नगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध धंद्यांच्या घटना आणि वाढलेल्या गुन्ह्यांबाबत प्राप्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) होय,
अशा तक्रारीबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच गुन्हे घडू नये म्हूणन शोध पथक, नियमीत रात्रगस्त व इतर उपाय योजले जातात. तसेच अवैध धंद्याची माहिती घेऊन गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्यात येते.
तसेच सदर निवेदनामधील तक्रारीनूसार संबंधित अधिकारी व अंमलदार यांना अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच गुन्हे आढावा बैठका घेऊन अवैध धंद्याबाबत मिळालेल्या माहितीनूसार गुन्हेगारांवर कडक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आली आहेत. त्यानूसार सन २०२३ मधील माहे एप्रिल पर्यंत मंगळसुत्र चोरी, चैन हिसकावणे, चोरी, घरफोडी यासह विविध अवैध धंद्याविरूध्द धुळे शहर पोलीस स्टेशन व आझाद नगर पोलीस स्टेशन अंतर्गत १९८ गुन्हे दाखल करण्यात आली आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पुणे शहरातील सिंहगड किल्ल्यावरील गाडीतळा कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी बसविण्यात आलेले महागडे साहित्य चोरीला गैल्याबाबत

**(३३) ६०७५२ (३०-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सिंहगड किल्ल्यावरील गाडीतळा कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी बसविण्यात आलेले महागडे साहित्य दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास चोरीला गेल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चोरीला गेलेल्या मुद्देमालाचा तपशील आणि त्यांची अंदाजे काय किंमत असून प्रकरणातील तपास कामाची सध्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, सदरहू प्रकार भविष्यात घडू नयेत यासाठी कोणत्या स्वरुपाची प्रतिबंधात्मक उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) होय.
(२) सदर गुन्हयामध्ये एकूण अंदाजे रु. ७,५०,०००/- किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेला असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-
१) रु. २,००,०००/- किंमतीचे एक कचऱ्याचा चुरा करणारे ग्रीन पांडा गार्डन वेस्ट श्रेडर ३.० कंपनीचे मशीन.
२) रु. ३,५०,०००/- किंमतीचे एक प्लास्टीकचा चूरा करणारे ग्रीन पांडा प्लास्टीक वेस्ट श्रेडर २.० कंपनीचे मशीन.
३) रु. २,००,०००/- किंमतीचे ओल्या कच-याचे खत करणारे अँटोमेटीक टमलर कंपोस्टर २००० कंपनीच्या मशीनमधील हिंदूस्थान कंपनीचा १ गियर बॉक्स, क्रामटन कंपनीची २ एचपी ची २ मोटर, चैन.
सदर प्रकरणाबाबत पोलीस ठाणे, हवेली (जि.पुणे) गु.र.नं २१९/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९, ४११,३४,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(३) सदर गुन्हयामध्ये एकूण ११ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न असून त्यापैकी ०९ आरोपींना अटक करण्यात आली होती. अटक आरोपींची जामिनावर सुटका झाली असून त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे. सदर आरोपींकडून अद्यापपर्यंत रु. ४५००/- हस्तगत करण्यात आले आहेत.
(४) सदर गुन्हयातील आरोपींची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांच्यावर फ़ौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली असुन, वनविभागाला सदर ठिकाणी गार्ड नेमणे बाबत व सीसीटीव्ही कॅमेरे लावणेबाबत कळविण्यात आहे. तसेच सदर भागांमध्ये पोलीसांकडून वेळोवेळी नाकाबंदी व पेट्रोलिंग करण्यात येत आहे.

---

## भांडूप येथील डोंगराळ भाग व दाटीवाटीने वसलेल्या झोपडपट्टी विभागातील संरक्षण भिंतीच्या पुर्नबांधणीबाबत

**(३४) ६०७६५ (२७-०४-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप हा डोंगराळ भाग असून दाटीवाटीने वसलेला झोपडपट्टी (स्लम) विभागात म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या संरक्षण भिती/आधारभिंती पावसाळयात पडल्याने मोठ्या प्रमाणात वित्त हानी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पडलेल्या संरक्षण भिंतीच्या पुर्नबांधणीची मागणी वारंवार स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींकडून संबंधीत विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने संरक्षण भिंतीच्या पुर्नबांधणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्यामार्फत सन २०२१-२२ मध्ये भांडूप (पश्चिम) येथील डोंगराळ भागामध्ये संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांचेकडून अंदाजपत्रकांसहीत प्राप्त प्रस्तावानुसार रुपये ८३६.८९ लक्ष इतक्या रकमेच्या ३१ कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात

आली व निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी सन २०२२-२३ मध्ये रुपये ४३२.०० लक्ष इतक्या रकमेच्या ८ कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली व निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील लोअर दुधना प्रकल्पातील मायनर १६ कालव्यातील पाणी चारीमधील साचलेला गाळ काढण्याबाबत

**(३५) ६०८१० (२६-०४-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर दुधना प्रकल्प (ता.सेलू, जि.परभणी) येथील मायनर १६ कालव्यातील हातनूर, साळेगाव, खेरडा या तीन गावाच्या शिवारातून पाणी चारी गेली मात्र या चारीमध्ये तब्बल दोन वर्षापासून संबंधित विभागाने अतिवृष्टीमध्ये अडकलेला गाळ न काढल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे पाण्याअभावी मोठे नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिवारातील शेतकऱ्यांना मायनर १६ या चारीमध्ये अतिवृष्टीच्या काळात गाळ साचल्यामुळे या ठिकाणी पाणी सोडण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, नियमाप्रमाणे शेतकऱ्यांनी पाणी मागणीचा अर्ज सादर करून संबंधित विभागाचे अभियंता यांच्याकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने सेलू तालुक्यातील हातनुर, साळेगाव, खेरडा या गावातील शेतकऱ्यांना मायनर १६ कालव्यातील पाणी चारी मधून तात्काळ पाणी देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
निम्न दूधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील मायनर क्र.१६ वरील सिंचन क्षेत्रातील भूधारकांनी सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या वर्षाचे रब्बी हंगामात पाणी मागणी अर्ज क्षेत्रिय कार्यालयास दिलेले नसल्यामुळे सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले नाही.

तथापि सन २०२२-२३ मध्ये रब्बी हंगामाच्या तिस-या पाणी पाळी मध्ये लाभधारकांनी जानेवारी -२०२३ मध्ये रीतसर पाणी मागणी अर्ज केल्यानंतर यांत्रिकी विभागाच्या मशिनरीद्वारे चारीतील काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे साचलेला गाळ काढून सिंचनाकरीता पाणी देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

यांत्रिकी विभागाच्या मशिनरीद्वारे मायनर मधील काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे साचलेला गाळ काढून सन २०२२-२३ च्या रब्बी हंगामातील तिस-या पाणीपाळीमध्ये सिंचनाकरिता पाणी देण्यात आले आहे.तसेच लाभधारकांकडून रीतसर पाणी मागणी अर्ज क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाल्यास पाणी देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात हिंगोली जिल्ह्यातील महावितरणच्या हिंगोली मंडळाचे प्रभारी उपव्यवस्थापक यांना निलंबित करण्याबाबत**

**(३६) ६०८२० (२७-०४-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील महावितरणाच्या हिंगोली मंडळाचे प्रभारी उपव्यवस्थापक यांना निलंबित करण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्सनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी व्यवस्थापकाने सन २०१७ मध्ये केलेल्या कामाबाबत आयोगाने त्यांच्यावर ठपका ठेवला आ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) लागू नाही.

---

**मीरा रोड (पूर्व), (जि.ठाणे)कनिक्य नगर पोलिस स्टेशनच्या निरीक्षकांनी एका महिलेस सीआरपीसी च्या ४१ अंतर्गत बजाविलेली नोटीस**

**(३७) ६०८६८ (२७-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील, जिल्हा-ठाणे स्थित मीरा रोड (पूर्व), कनिक्य नगर पोलिस स्टेशनचे निरीक्षक तानाजी सावंत यांनी श्रीमती कोरी यांना 'सीआरपीसी'च्या ४१ अंतर्गत नोटीस बजावून फिर्यादीनाच पोलिस स्टेशनमध्ये बोलावले, पूर्णपणे असंबद्ध तसेच अभौतिक कागदपत्रे आणि माहितीची मागणी केली, तसेच पीडितेला शहरातून बाहेर काढण्यासाठी मुंबई पोलिस कायद्याची कलमे लावण्याची धमकी देण्याची बाब मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०२२ वा त्यासुमारास उद्देशून लिहिलेल्या पीडितेच्या तक्रार अर्जातून समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एजाज अन्सारी आणि नूर अन्सारी यांनी माहे जानेवारी, २०२१, मध्ये वा त्यादरम्यान शीतल नगर मीरा रोड येथील रहिवासी श्रीमती कोरी यांच्याशी छेडछाड केल्याचे संदर्भात एफआयआर दाखल करण्यास स्थानिक पोलीस स्टेशनकडून नकार देण्यात आला व त्यानंतर पिडितेने तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्याशी संपर्क साधल्यानंतर एफआयआर नोंदवण्यात आला मात्र, त्यानंतरही कथित आरोपींना वाचवण्यासाठी आणि बचाव करण्यासाठी कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एफआयआरच्या नोंदीनंतर आरोपींनी त्यांची कार कोरी यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला तसेच पीडित महिलेच्या भावाला तडीपार का करण्यात येऊ नये यासाठी कारणे दाखवण्यासाठी आणि एक वर्षाच्या चांगल्या वर्तणुकीसाठी बॉण्डवर स्वाक्षरी करण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग १, २, व ३ प्रकरणी सखोल चौकशीअंती संबधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :**(१) श्रीमती चेतना कोरी यांनी पोलीस आयुक्त, मिरा रोड यांना दि. ८/१२/२०२२ रोजीच्या निवेदनान्वये या आशयाचा तक्रार अर्ज सादर केला आहे.

(२) सदर प्रकरणी श्रीमती चेतना कोरी यांचे फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणेस I ३७/२०२१ भा. दं. वि. सं. कलम ३५४, ५०९, ३४ अन्वये आरोपी मेहबुब अन्सारी, नुर अन्सारी व एजाज अन्सारी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) श्रीमती चेतना कोरी यांचे बंधू श्री. रिकी कोरी यांचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गु.र. क्र. II ५१२/२०२२ अन्वये गुन्हा नोंद आहे. श्री. रिकी कोरी हे रस्ता ओलांडत असतांना एजाज अन्सारी यांचे मोटार कारचा धक्का लागल्याने त्यांचेत वाद झाला. या प्रकरणी रिकी कोरी यांनी मिरारोड पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन एजाज अन्सारी यांचेविरुध्द अ. द. गुन्हा नोंद क्र. १५८४/२०२२, भा. द. वि. सं. क. ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद आहे. तसेच एजाज अन्सारी यांनी देखील रिकी कोरी यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीवरुन मिरारोड पोलीस ठाणे येथे अ. द. गुन्हा नोंद क्र. १५८३/२०२२, भा. द. वि. सं. क. ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

रिकी कोरी यांना सीआरपीसी ४१ (अ) (१) अन्वये तपासाकरीता नोटीस अदा केली असून ती नोटीस श्रीमती चेतना कोरी यांना अदा करण्यात आलेली नाही. श्रीमती चेतना कोरी यांना शहराबाहेर काढण्यासाठी मुंबई पोलीस कायदा अन्वये कलमे लावण्याची धमकी देण्यात आलेली नाही. रिकी कोरी यांना तडीपार का करण्यात येऊ नये, यासाठी कारणे दाखविण्यासाठी व एक वर्षाच्या चांगल्या वर्तणूकीसाठी बॉन्डवर स्वाक्षरी करण्याचे सांगण्यात आले नाही.

(४) मिरारोड पोलीस ठाणे येथे रिकी कोरी यांचेविरुध्द गु. र. क्र. II ५१२/२०२२ व महेबुब अन्सारी, नुर अन्सारी व एजाज अन्सारी यांचेविरुध्द गु. र. क्र. I ३७/२०२१ अन्वये दाखल प्रकरणांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदरहू प्रकरणे मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

---

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून वैयक्तिक लाभ योजनेअंतर्गत मिळणा-या अनुदानापासून लाभार्थि वंचित रहिल्याबाबत

**(३८) ६०८९८ (०८-०५-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी समाजाच्या विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत योजना राबविल्या जात असून त्यासाठी शासनामार्फत दरवर्षी कोटयावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत एक वर्षापसून सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नसल्यामुळे लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजना तातडीने लागू करणे तसेच लाभार्थ्यांना व्यक्तिगतरित्या लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०७-२०२३) :** (१) खरे आहे.

(२) व (३) आदिवासी विकास विभागाच्या दि. २१/०६/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात किंवा केंद्रीय निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नाही अशा अभिनव स्वरूपाच्या योजना प्रकल्प स्तरावरून राबविण्यात येतात. सदर योजनेंतर्गत उत्पन्न निर्मितीच्या/वाढीच्या, प्रशिक्षणाच्या किंवा कौशल्य विकासाच्या व मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना राबविण्यात येतात. सदर योजनेंतर्गत सन २०२१-२२ करिताच्या योजनांकरीता रू.२२,२७,११,६७०/- इतक्या निधीच्या आकारमानाच्या वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या योजनांकरीता एकूण ७७,३१३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील आदिवासी शाळांमध्ये सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(३९) ६०९६० (२६-०४-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील कुरखेडा, कोरची, धानोरा येथील आदिवासी आश्रम शाळांमध्ये शिक्षकांसह पुरेशा सोई सुविधा व शाळांचे पक्के बांधकाम नसल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोशल जस्टीस या अशासकीय संस्थेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात याचिका दाखल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये आवश्यक शिक्षकांसह पुरेशा सोई सुविधा व शाळांचे पक्के बांधकाम करण्याची कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-०७-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ४ शासकीय व १ अनुदानित आश्रमशाळेत मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याच्या कारणाने सोशल जुरिस्ट ए सिव्हील राईट्स ग्रुप यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र १/२०२३ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, नागपूर यांनी उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. सदर समितीमार्फत सदर आश्रमशाळांतील मुलभूत सोयी-सुविधांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणी दरम्यान अनुदानित आश्रमशाळा वडेगाव, ता. कुरखेडा या आश्रमशाळेच्या इमारतीमध्ये काही किरकोळ व महत्वाच्या दुरुस्त्या करण्यासाठी तपासणी दरम्यान संस्थेस सूचना देण्यात आल्या. सदर सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी संस्थेने दिनांक २१.०३.२०२३ व २४.०३.२०२३ रोजी ठराव पारीत केला आहे. शासकीय आश्रमशाळा, सोडे, ता. धानोरा या आश्रमशाळेत शाळेच्या परीसरात शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याकरीता १२ निवासस्थानाचे बांधकाम सुरु आहे. शासकीय आश्रमशाळा गोडलवाही, ता. धानोरा या आश्रमशाळेची इमारत पक्की व सुरक्षित आहे. शासकीय आश्रमशाळा लाहेरी, ता. भामरागड मुलामुलींकरीता निवास्थानाची व्यवस्था स्वतंत्र करण्यात आली असून सदर निवासस्थानाचे बांधकाम तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्नानगृहे व शौचालयाचे बांधकाम जिल्हा वार्षिक उपयोजना निधीमधुन मंजूर करण्यात आले आहे. शासकीय आश्रमशाळा, लोहारा, ता. मुलचेरा येथील आश्रमशाळेचे बांधकाम जुन्या टाईपप्लॅन नुसार असून पक्के व मजबुत आहे. शाळेमध्ये सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुंबईतील वरळीमध्ये विवाहित महिलेने केलेली आत्महत्या

**(४०) ६०९६७ (२७-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी स्थित विवाहित महिला श्रीमती गौरी परदेशी यांनी परिसरातील पीठाची गिरणी मालकाच्या मुलाने चारिञ्या विषयी केलेली अश्लील शेरेबाजी सहन न झाल्यामुळे बसलेल्या मानसिक धक्यामुळे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वरळी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद होऊन ही पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे परीसरातील नागरीकांनी मोठया प्रमाणात बॅनर लाऊन न्यायाची मागणी केली, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) वरळी पोलीस ठाणे हद्दीत पंचशील को.ऑ.हौ. सोसायटीच्या कंपाउंड परिसरात मयत महिला हिस न्याय मिळाला पाहिले तसेच आरोपिंना अटक झाली पाहिजे अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी दिनांक १८.०१.२०२३ रोजी वरळी पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू नोंद क्रमांक १३/२३ कलम १७४ फौ.प्र.संहिता अन्वये नोंद करण्यात आला असून, मयत महिलेच्या पतीने दिलेल्या तक्रारीवरुन वरळी पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र. ५३/२०२३ कलम ३०६, ३५४(अ), ३४ भादंवि अन्वये ३ आरोपिंविरु गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांनी दिलेला पुरवणी जबाब नोंद करुन कलम ३५४(अ) वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात तीन आरोपिंना अटकपुर्व जामीन मंजूर झालेला असून त्यांच्याविरोधात फौ.द.प्र.सं. कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई केलेली आहे. सदर प्रकरणी तपास पुर्ण झालेला असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राजूर व अकोले (ता.अकोले, जि.अहमदनगर) तालुक्यांत राजरोसपणे बेकायदेशीर धंदे मोठया प्रमाणात चालू असल्याबाबत

**(४१) ६१०२८ (०८-०५-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूर व अकोले (जि.अहमदनगर) पोलीस स्टेशन हद्दीत मागील वर्षभरापासून तेथील वाहनांच्या चोऱ्या, जुगार व मटके अड्डे बेकायदा चालविले जात असून दारुबंदी असतांनासुध्दा दारु विक्री मोठया प्रमाणात सुरु असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बेकायदेशीर व अवैध धंद्याबाबत तेथील पोलीस स्टेशनला नागरिकांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी करुनही पोलीस अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्याऐवजी एकप्रकारे अवैधधंद्याना संरक्षण देत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचे दि.३१ जाने.२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे व चौकशीनुसार अवैधधंद्यांना संरक्षण देणाऱ्या संबंधित पोलिसांविरुध्द तसेच अवैधधंदे करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१), (२) व (३)
हे खरे नाही,

अकोले व राजूर पोलीस स्टेशन हद्दीत बेकायदेशीर अवैध धंद्याबाबत गोपनीय माहिती काढुन तसेच नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अवैध धंदे करणारे लोकांविरुध्द प्रभावी कारवाई करुन अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्याकरीता सातत्याने कारवाई करण्यात येते.

अशाप्रकारे अकोले व राजूर पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्याबाबत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

| प्रकार | सन २०२२ | सन २०२३ (माहे एप्रिल अखेर) |
|---|---|---|
| वाहनचोरी | ५७ | ३८ |
| दारुबंदी | १९९ | ५७ |
| जुगार | ३६ | २६ |

तसेच अवैध धंदे करणाऱ्या इसमांविरुध्द सन २०२१ ते आजपावेतो महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे ४६ आरोपीविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच पोलीस स्टेशन हद्दीतील धार्मीक कार्यक्रम, स्थानिक जत्रा, उत्सवाचे दरम्यान सीआरपीसी १४४ (२) प्रमाणे १४८ इसमांविरुध्द काही कालावधीकरीता स्थानिक हद्दीत येण्यात प्रतिबंध केला आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ५५/५६ प्रमाणे ६ आरोपीतास हद्दपार करण्यात आलेले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील कोळी समाजबांधवांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला मोर्चा

**(४२) ६१२६६ (०८-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो कोळी समाजबांधवांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे व इतर मागण्या पूर्ण होण्यासाठी दि. २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जिल्हाधिकारी याच्याकडे निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त जिल्हयातील कोळी समाजबांधवांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली मा. आयुक्त/अध्यक्ष, जात पडताळणी समिती, पुणे विभाग, पुणे, अध्यक्ष, विभागीय जात पडताळणी समिती, कोल्हापूर, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, पुणे, सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हाध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा कोळी समाज विकास मंडळ (रजि.) कोल्हापूर यांची बैठक दि. २८.०२.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.
(३) सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, अर्जदारांनी सादर केलेले पुरावे व कागदपत्रांचा सखोल अभ्यास करुन त्याप्रमाणे जात प्रमाणपत्र देण्याबाबत सूचना सर्व उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील एका व्यक्तीने केलेल्या संशयास्पद आत्महत्येची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत

**(४३) ६१३९० (२७-०४-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील श्री.राजू पी.रामा काळे, राहणार गायत्रीनगर, सेलू यांची दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास संशयास्पद आत्महत्येची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्याच्या नातेवाईकांनी या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करावी, यासाठी पोलिस अधिक्षक, परभणी यांना दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले असून देखील अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे. मयत याने त्यांची पत्नी त्यांच्या घरी नांदायला येत नसल्याने रागाच्या भरात घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सेलु येथे अकस्मात मृत्यु क्रमांक १२/२०२२ कलम १७४ सिआरपीसी अन्वये नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशी करीता प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, अर्जदारास बोलविले असता अर्जदार हे वांरवार पोलीस स्टेशनला चौकशीकामी जाण्यास टाळाटाळ करीत होते. मात्र मयताची पत्नी व त्यांचे नातलग यांनी दिलेल्या जबाबावरुन त्यांची सदर मयताच्या मरणाबाबत काहीही एक तक्रार नाही असे सांगितले. सदर प्रकरणामध्ये पोलीस स्टेशन येथे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच सदर आकस्मिक मृत्यु मध्ये घातपाताचा प्रकार दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फार्मसीमध्ये गुंतवणूक करण्याच्या नावाखाली यवतमाळचे बालरोगतज्ञ यांची झालेली फसवणूक

**(४४) ६१४२३ (२८-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विकास बोरा व अन्य दोन लोकानी फार्मसीमध्ये गुंतवणूक करण्याच्या नावाखाली यवतमाळचे बालरोगतज्ञ डॉ संजू लखनलाल जोशी यांची १ कोटी १८ लाखांनी फसवणूक करण्यात आली असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी २०२३, रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी नागपूर येथील धंतोली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१), (२) व (३) नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंर्तगत पोलीस ठाणे धंतोली, नागपुर शहर येथे दि ३१.०१.२०२३ रोजी फिर्यादी डॉ. संजू लखनलाल जोशी यांचेकडून आरोपी याने रु. १ कोटी ५७ लाख ३५ हजार रुपये घेतले व दरमहा रु. ३ लाख परतावा देण्याचे ठरले होते. तथापि, त्यापैकी रु. ३८ लाख़ ८० हजार परत केले व उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याच्या तक्रारीवरून अप क्र २९/२०२३ कलम ४०६, ४१७, ४२० भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासाधीन आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपुरी-त्र्यंबकेश्वर येथील अवैध गावठी ( हातभट्टी) दारु धंदे बंद करण्याबाबत

**(४५) ६१५२३ (३०-०४-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील अवैध गावठी (हातभट्टी) दारु धंदे व इतर अवैध धंदे बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,
अशा प्रकारचे निवेदन मा. मुख्यमंत्री कार्यालय येथे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, मा.वि.स.स. यांचे दिनांक १३.०७.२०२२ रोजीचे निवेदन पोलीस अधीक्षक, कार्यालय नाशिक येथे प्राप्त झालेले आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने त्रंबकेश्वर - इगतपुरी मतदार संघातील इगतपुरी, घोटी, वाडीवऱ्हे, त्रंबकेश्वर व हरसूल पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्याविरुध्द सन २०२२ मध्ये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | प्रकार | दाखल गुन्हे |
|---|---|---|
| १ | गावठी हातभट्टी व दारु | २४१ |
| २ | देशी, विदेशी दारु | ११९ |
| ३ | जुगार | ५० |
| ४ | गुटखा | ०३ |
| ५ | अवैध शस्त्र | ०४ |

(३) विलंब झालेला नाही.

---

**इगतपुरी- त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील आदिम जमाती योजना अंतर्गत विकास कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ६१५३० (०८-०५-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी- त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील आदिम जमाती योजना अंतर्गत विकास कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा. लोकप्रतिनिधींच्या निवेदनामध्ये सुचविलेल्या गावांपैकी पात्र गावांतील कामांना शासन निर्णय दिनांक ३१ मार्च २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नागपूर शहर देशात नवजात बालक विक्री होत असल्याबाबत**

**(४७) ६१५३९ (२७-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रासह अन्य राज्यात नवजात बाळ विक्री करण्यासाठी नागपूर शहर देशात केंद्रस्थानी असून वर्षभरात ४० ते ५० नवजात बाळांची नागपुरातून परराज्यात विक्री झाली असल्याचे माहे डिसेंबर २०२२, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच बालकांची होत असलेली खरेदी विक्रीवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. सन २०२२ या वर्षामध्ये नागपूर शहर पोलीस आयुक्तालया मधील विविध पोलीस स्टेशनमध्ये बाल विक्री/ बेकायदेशीर दत्तक प्रकरणी ११ गुन्हे दाखल आहेत.

(२) व (३) सन २०२२ या वर्षामध्ये बाळ विक्री/बेकायदेशीर दत्तक प्रकरणी नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमधील विविध पोलीस स्टेशनमध्ये ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण ५६ आरोपींना अटक करण्यात आली असुन १० गुन्ह्यांमध्ये मा. न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून १ गुन्ह्यामध्ये दोषारोप दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

बाळ विक्री/बेकायदेशीर दत्तक प्रकरणी प्राप्त तक्रारींची तात्काळ दखल घेणे, अशा तक्रारींचा तपास गुन्हे शाखा, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, यांच्याकडून करणे. तसेच, पोलीस स्टेशन स्तरावर शांतता समिती, मोहल्ला समिती, महिला दक्षता समिती, इ. च्या बैठका आयोजित करून त्यांचा सहभाग अशा प्रकारच्या गुन्ह्यांना/घटनांना प्रतिबंध करण्यासाठी करणे, यांसारख्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## महाराष्ट्रातील दारुची गुजरातमध्ये तस्करी होत असल्याबाबत

**(४८) ६१८४२ (२७-०४-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील दारुची गुजरातमध्ये तस्करी केल्याप्रकरणी गुजरात पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात पालघरच्या एका पोलिस अधिकाऱ्याचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दारुची तस्करी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणी श्री. अनंत जमना थांगडा, पोलीस उप निरीक्षक यांना पोलीस अधीक्षक, पालघर यांचे दि. १८/०१/२०२३ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ पूर्व भागातील प्रकाश नगर येथील रहिवाश्यांकरिता सर्वे क्र. १६६/५ या शासकीय जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासंदर्भात

**(४९) ६१९५६ (२५-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ पूर्व भागातील प्रकाश नगर येथील रहिवाश्यांकरिता सर्वे क्र. १६६/५ या शासकीय जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थानिक लोकप्रतिनिधी यांची दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी बैठक पार पडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बैठकीतील निर्देशानुसार उप अधिक्षक, भूमी अभिलेख विभागाकडे दि.१८.०१.२०२३ अन्वये अर्ज सादर करुन जागा मोजणी साठीचे शासकीय शुल्काचा भरणा अंबरनाथ नगर परिषदेने केलेला आहे. त्यानुसार जमिनीची मोजणी करण्यात आली असून, शासकीय मोजणीचा नकाशा अंबरनाथ नगर परिषदेकडे उपलब्ध झाला असून तो कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडून प्रकाश नगर अंबरनाथ (पू) येथील झोपडपट्टी व्याप्त क्षेत्राचा Land Survey/Drone Survey करण्यात आला आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम १९७१ चे कलम ३क(१) नुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करणेसाठी प्रस्ताव दाखल करण्याबाबत प्रकाशनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेस कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पांचे काम अपूर्ण अवस्थेत असलेल्या प्रकल्पांच्या पुर्ततेसाठी महारेराने घेतलेला पुढाकार

**(५०) ६२९२३ (२७-०४-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः मुंबईतील काही कारणास्तव गृहनिर्माण प्रकल्पांचे काम अपूर्ण अवस्थेत असलेल्या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी महारेराने पुढाकार घेऊन त्यांच्या कार्यपध्दतीसाठी चार गटांची रचना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने कार्यपध्दतीचे एकंदर स्वरुप काय आहे व त्यामध्ये कोण सदस्य असणार आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे व आतापर्यंत किती बंद स्थितीत असलेल्या गृहप्रकल्पांच्या कामांना सुरुवात करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२३) :** (१) व (२) दि.०१.०५.२०१७ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीमध्ये महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामध्ये नोंदणी झालेल्या परंतु, मुदत संपलेल्या प्रकल्पांच्या पुर्ततेसाठी विकासकांच्या संघटनांना संबंधित प्रवर्तकांसोबत चर्चा करुन ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत असे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने निश्चित केले आहे. तसेच महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने प्रवर्तकांशी योग्य तो संबंध प्रस्तावित करण्यासाठी सन २०१९ मध्ये ६ SRO ( स्वयं नियामक संस्था) ची स्थापना करण्यात आली आहे. ते पुढील प्रमाणे आहेत :-
१) NARDECO WEST FOUNDATION
२) DREDAI -MCHI
३) CREDAI MAHARASHTRA
४) Builder Association of India Maharashtra State
५) Marathi Bandhakm Vyavasaik Association
६) Brihanmumbai Developers Association
३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामध्ये नोंदणी केल्यानंतर दि.१८.०५.२०२३ पर्यंत ७०६५ प्रकल्प बंद असल्याबाबत निदर्शनास आले आहेत. त्यापैकी ६९५ प्रकल्प पुर्ण झाले असून ३४९ प्रकल्पातील विकासकांनी प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी वाढवून मिळण्याकरिता नियामक प्राधिकरणाकडे अर्ज दाखल केले आहेत. सद्य:स्थितीत

६०२१ प्रकल्प बंद आहेत. जे प्रकल्प बंद पडलेले आहेत त्या प्रकल्पांच्या प्रवर्तकांशी चर्चा करुन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी SRO मार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.